**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ /आषाढ १७, १९४६ (शके)**

**६०.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेतील सर्वश्री विलास पोतनीस व कपिल पाटील यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै, २०२४ रोजी समाप्त झाली आहे. सदर सन्माननीय सदस्यांकडून विद्यमान अधिवेशनाकरिता तारांकित प्रश्न सूचना प्राप्त झाल्या होत्या.

सर्वश्री.विलास पोतनीस, श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत समाप्त झाली असल्याने त्यांचेकडून पहिल्या टप्प्यातील स्वत:च्या नावाने स्वतंत्ररित्या प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचना आहे त्या स्तरावर थांबविण्यात येऊन उक्त सूचना व्यपगत समजण्यात याव्यात.

तसेच श्री.विलास पोतनीस, वि.प.स यांचेकडून दुसऱ्या टप्प्यातील स्वत:च्या नावाने स्वतंत्ररित्या प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचना व्यपगत करण्यात आल्या असून, दुसऱ्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचनांमध्ये इतर विद्यमान सदस्यांची नावे अनुमोदक म्हणून असल्यास सदर प्रश्न सूचना व्यपगत न करता पुढील विद्यमान सदस्यांच्या नावे दाखविण्यात आल्या आहेत व इतर विद्यमान सदस्यांच्या प्रश्नांस अनुमोदक म्हणून सदर सदस्यांचे नाव असल्यास प्रश्न सूचनेतून त्यांचे नाव वगळण्यात आले आहे.

विधान भवन,
मुंबई
दिनांक: ८ जुलै, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव-१ (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद